I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** कवठेमहांकाळ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0353  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/09/2025 05:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 08/09/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/09/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:27 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/09/2025  **Time (वेळ):** 04:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/09/2025 04:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 01 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मंडळ अधिकारी , कवठेमहांकाळ कार्यालयात,कवठेमहांकाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. अभिजीत सुधाकर चंदनशिवे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विजयनगर, कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | विजयनगर, कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8208299580

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. मारुती विलास खोत | | | 1. विठुरायाचीवाडी,कवठेमहांकाळ, कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | श्री. संजय किसन हारगे | | | 1. विठुरायाचीवाडी,कवठेमहांकाळ, कवठेमहांकाळ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 09.09.2025

मी श्री. अभिजीत सुधाकर चंदनशिवे, वय-33 वर्ष, व्यवसाय:- नोकरी, फायरमन, अग्निशमन विभाग, नगरपंचायत कार्यालय कवठेमहांकाळ, शिक्षण :- बी.ए. रा.विजयनगर, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ जि. सांगली. मो.नं. 8208299580

मी वरील ठिकाणी माझी आई सौ संगीता, वडील सुधाकर, भाऊ प्रितम व भावजय सौ स्वाती असे एकत्रात राहण्यास आहे. माझी आई सौ संगीता सुधाकर चंदनशिवे हिचे नांवे कवठेमहांकाळ गांवचे हद्दीतील गट नंबर 1494 मधील तीन गुंठे जमीन दि.03.01.1998 रोजी दुय्यम निबंधक कवठेमहांकाळ यांचे कार्यालयात दस्त क्र. 110/1998 अन्वये दस्त करुन श्री शिवाजी गंगाराम माळी रा. कवठेमहांकाळ यांचेकडून खरेदी केली होती. आमचे प्रमाणेच 1) गणपतराव बापूसो जाधव, 2) शिवाजी शंकर हंकारे व शहाजी शंकर हंकारे, 3) रमीजा दिलावर मुजावर यांनी सुद्धा सदर गटातील जमीन श्री शिवाजी गंगाराम माळी रा. कवठेमहांकाळ यांचेकडून व 4) शोभा पांडुरंग खोत यांनी अशोक शिवाजी माळी रा. कवठेमहांकाळ यांचेकडून 9 गुंठे शेतजमिन खरेदी केली होती. नमुद जमीनीची सात बारा उता-यावर नोंद होण्यासाठी मी माझे आईचा अर्ज दि.11.01.2019 रोजी तलाठी कवठेमहांकाळ यांचेकडे खरेदी दस्त जोडून अर्ज दिला होता. त्याप्रमाणे तलाठी कवठेमहांकाळ यांनी नोंद घेवुन नोंद मंजुरी करीता मंडळ अधिकारी यांचेकडे पाठवली मंडळ अधिकारी यांनी "तांत्रीक दृष्ट¬ा नोंदीचा अंमल 7/12 वरती दिसुन येत" नसल्याने सदर नोंद दुबार धरण्यासाठी नामंजुर केली.

त्यानंतर दि.16.08.2024 रोजी सदर गुंठेवारी जमीनीचे नियमिती करण करण्यासाठी माझे आईचे नांवचा मा. तहसिलदार सा ो कवठेमहांकाळ यांना अर्ज केला होता. त्याप्रमाणे 1) गणपतराव बापूसो जाधव, 2) शिवाजी शंकर हंकारे व शहाजी शंकर हंकारे, 3) रमीजा दिलावर मुजावर, 4) शोभा पांडुरंग खोत यांनी सुद्धा मा. तहसिलदार सा ो कवठेमहांकाळ यांचेकडे गट नंबर 1494 मधील त्यांनी खरेदी केलेल्या गुंठेवारी जमीनीचे नियमीतीकरण करण्यासाठी अर्ज केले होते. त्यानंतर आम्ही तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे गुंठेवारी जमीनीचे नियमीतीकरण करण्यासाठी दिलेले अर्ज मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांचेकडे चौकशी करीता पाठविलेबाबत समजले व माझ े आईचा अर्ज हा दि.23.08.2024 रोजी पाठवण्यात आले असलेचे मला समजले. त्यानंतर मंडळ अधिकारी यांनी जमीनींची स्थळपाहणी व पंचनामे करुन जाब जबाब नोंद करुन माझे आईचा गुंठेवारी नियमतीकरण अहवाल तहसिलदार कवठेमहांकाळ यांना दि.10.12.2024 पाठवला होता.

तहसिलदार कवठेमहांकाळ यांनी आम्ही दिलेले गुंठेवारी जमीन नियमीतीकरणाचे अर्ज प्रस्तावाने प्रांत अधिकारी मिरज यांचेकडे पाठविले त्यामध्ये माझे आईचा अर्ज हा दि.31.12.2024 रोजी पाठविला असलेच मला समजले. त्यानंतर आम्ही त्याबाबत तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ येथे चौकशी केली असता, तेथे आम्हाला आमचे गुंठेवारी नियमीती करणाचे प्रस्ताव प्रांत ऑफीसकडून फेर फारची खरी नक्कल व मुळ मालक मयत असल्याचे दिसुन आल्याने व आम्ही खरेदी केलेल्या जमीनींची दुबार खरेदी झाली असल्याने प्रकरण सविस्तर चौकशी करीता तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ यांना प्राप्त झाले होते. सदर प्रकरणांची सविस्तर चौकशी होण्यासाठी तहसिल कार्यालय कवठेमहांकाळ यांचेकडून मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांचेकडे पाठवण्यात आले असल्याचे समजले. त्यामध्ये माझे आईचे प्रकरण हे दिनांक 23.01.2025 रोजी मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांचेकडे पाठवण्यात आले असल्याचे मला समजले



Scanned with OKEN Scanner

आम्ही खरेदी केलेली जमीन शिवाजी गंगाराम माळी यांनी त्यांची नात कोमल धनाजी माळी यांचे पती धनाजी सदाशिव माळी यांना विक्री केल्याने सदर जमीनीची दुबार खरेदी होवुन त्याची फेरफार नोंद मंजुर झाली असल्याने ती फेरफार नोंद रद्द होण्यासाठी व मुळ मालक म्हणजेच शिवाजी गंगाराम माळी यांचे नांव सात बारा उता-यावर आनण्यासाठी प्रांताधीकारी मिरज यांचेकडे अपिल क्र. आरटीएस/अपील/78/2025 अन्वये अपील केले होते. त्यामुळे प्रांताधिकारी मिरज यांचेकडून त्रुटीवर आलेले आमचे गुंठेवारी जमीन नियमीती करणाचे प्रस्ताव प्रांताधिकारी मिरज यांचेकडे केलेल्या अपीलाचा अंतीम निर्णय होई पर्यंत प्रलंबीत ठेवणे बाबत मी माझे आईचा दि. 24.04.2025 रोजी तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे अर्ज केला होता. त्याप्रमाणे वरील नमुद इसमानी तहसीलदार कवठेमहंकाळ यांना अर्ज सादर केले होते.

त्यानंतर मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांनी दि.15.05.2025 रोजी आम्ही प्रकरण प्रलंबीत ठेवणे सबंधीत दिले अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी सा ो मिरज यांचे अंतीम आदेशाकरीता प्रकरण तात्पुरते निकाली ठेवणेस हरकत नसले बाबत अहवाल तहसिलदार कवठेमहांकाळ यांना पाठवला होता.

त्यानंतर दि.04.08.2025 रोजी प्रातांधिकारी मिरज यांनी आम्ही केले अपीलाचा आमचे बाजुने निर्णय होवुन खरेदी गटांचे बाजार मुल्या नुसार 5 टक्के रक्कम भरुन घेवुन नियमीती करणासाठी उपविभागीय अधिकारी मिरज यांचेकडे नियमीती करण प्रस्ताव सादर करणे बाबत आदेश झाल्याने आम्ही तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे गुंठेवारी नियमानुकुल प्रलंबीत प्रकरणे मा. प्रांताधिकारी मिरज यांचे कार्यालयाकडे वर्ग करणे बाबत दि. 07.08.2025 रोजी अर्ज केला.

त्यानंतर आम्ही तहसिलदार कवठेमहांकाळ या कार्यालयात दि.07.08.2025 रोजी दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली आहे याची माहिती घेतली असता तेथे प्रांताधिकारी मिरज यांचेकडून त्रुटीवर आलेले प्रस्ताव व आम्ही गुंठेवारी नियमानुकुल प्रलंबीत प्रकरणे मा. प्रांताधिकारी मिरज यांचे कार्यालयाकडे वर्ग करणे बाबत केलेले अर्ज सविस्तर चौकशी करीता मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांचेकडे दि.19.08.2025 रोजी पाठवण्यात आले असल्याचे आम्हाला समजले.

त्यानंतर आम्ही मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांचेकडे सदर बाबत चौकशी केली असता त्यावेळी मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांनी सांगीतले प्रमाणे फेरफारची खरी नक्कल, आम्ही खरेदी केले जमीनीचे चालु बाजार मुल्यांकन व कोमल धनाजी माळी व धनाजी सदाशिव माळी यांचे संमत्ती पत्र अशी कागदपत्रे मंडळ अधिकारी कवठेमहांकाळ यांना दिली होती. आमचे गुंठेवारी नियमीती करण प्रकरणांचे अनुषंगाने माझे मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे सारखे येणेजाणे सुरु होते. त्यानंतर माझी आई व इतर 1) गणपतराव बापूसो जाधव, 2) शिवाजी शंकर हंकारे व शहाजी शंकर हंकारे, 3) रमीजा दिलावर मुजावर, 4) शोभा पांडुरंग खोत यांचे मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे चौकशी कामी प्रलंबीत असले गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्तावाचे पुढील कार्यवाही पार पाडणेकामी मला सांगुन त्याबाबतचे प्राधिकारपत्र सर्वांनी मला दिले.

दि.03.09.2025 रोजी मी आमचे गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरणांची सद्यस्थिती जाणुन घेण्यासाठी मंडळ अधिकारी मारुती विलास खोत यांची मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे भेट घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी आमचे गुंठेवारी नियमीती करणाचे प्रस्तावांचा अहवाल तहसिलदार कवठेमहांकळ यांना देण्यासाठी प्रत्येक प्रस्तावा करीता 7,000/- रुपये प्रमाणे प्रोटोकॉल करावा लागेल असे म्हणुन माझ्याकडे माझे आई व 1) गणपतराव बापूसो जाधव, 2) शिवाजी शंकर हंकारे व शहाजी शंकर हंकारे, 3) रमीजा दिलावर मुजावर, 4) शोभा पांडुरंग खोत यांचे एकुण पाच प्रस्तावांचे मिळुन 35,000/- रुपये लाचेची मागणी केली व मला प्रोटोकॉल बाबत अधिक माहिती घेण्याकरीता महसुल सेवक (कोतवाल) संजय किसन हारगे यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी संजय हारगे यांना भेटलो असता त्यांनी मंडळ अधिकारी मारुती खोत यांना सांगुन आमचे गुंठेवारी नियमीती करणाचे प्रस्तावांची सविस्तर चौकशी करुन अहवाल आमचे बाजुने तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे पाठवण्यासाठी प्रत्येक प्रस्तावा करीता 7,000/- रुपये प्रमाणे एकुण पाच प्रस्तावाचे मिळुन 35,000/- रुपये लाचेची माझ्याकडे मागणी केली आहे.

आम्ही मंडळ अधिकारी मारुती विलास खोत व महसुल सेवक (कोतवाल) संजय किसन हारगे यांना 35,000/- रुपये नाही दिले तर ते गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्तावांचे सविस्तर चौकशी अहवाल लवकर तहसिलदार कवठेमहांकाळ यांचेकडे पाठवणार नाहीत याची मला तसेच आम्हा सर्वांना खात्री आहे. आम्हाला मंडळ अधिकारी मारुती विलास खोत व महसुल सेवक (कोतवाल) संजय किसन हारगे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 08.09.2025 रोजी सकाळी 08.56 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री.अनिल कटके यांना माझे मोबाईलवरुन संपर्क करुन त्यांना सर्कल खोत व कोतवाल यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार कळवून माझी तक्रार कवठेमहांकाळ येथे येवून घेणेची विनंती केली असता, पोलीस उप अधीक्षक कटके साहेब यांनी मला पोलीस



Scanned with OKEN Scanner

निरीक्षक श्री.किशोरकुमार खाडे हे माझे तक्रारीबाबत पुढील कारवाई करीत असलेबाबत सुचना देवून त्यांचा मोबाईल नंबर देवून खाडे साहेबांना संपर्क करणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी लागलीच पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे साहेब यांना 09.08 वा चे सुमारास संपर्क करून त्यांना माझी सर्कल खोत व कोतवाल हारगे, मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ यांचेविरूध्द लाच मागणीची तकार कळवून माझी तक्रार कवठेमहांकाळ येथे येवून घेणेची विनंती केली. त्यावेळी खाडे साहेब यांनी मला ते पथकासह कवठेमहांकाळ येथे 12.00 वा चे सुमारास येत असलेच्या सुचना देवून आलेनंतर संपर्क करीत असलेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर खाडे साहेब यांनी दि. 08.09.2025 रोजी 12.15 वा चे सुमारास मला संपर्क करून कवठेमहांकाळ येथील महाकांली विद्यानिकेतनचे पाठीमागील रोडवर येणेचे सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी 12.20 चे सुमारास माझेकडील हिरो मो.सा. क्र. एमएच -10-सीएस-3785 वरून खाडे साहेब, पोलीस उप अधीक्षक श्री, कटके साहेब व पथकाची भेट घेतली. त्यावेळी कटके साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचेकडील शासकीय वाहनामध्ये बसलो. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री, कटके साहेब यांनी त्यांची व खाडे साहेबांची ओळख करून देवून पुढील कारवाई खाडे साहेब हे करतील असे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे साहेब यांनी मला दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला लाच मागणीचा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा सर्कल श्री. खोत व कोतवाल श्री. हारगे यांचेविरूध्दचा लाच मागणीचा हस्तलिखीत तक्रारी अर्ज समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर खाडे साहेब यांनी वाचून सही केली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. महेश धनपाल कनवाडे यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. श्रीनिवास विलास घोडके यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून मी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर खाडे साहेब यांनी कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे कार्यपध्दतीबाबत माहिती देवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर खाडे साहेब यांनी 13.21 वाजता पडताळणी कारवाईकामी त्यांचे, माझे व दोन्ही पंचांची निवेदन घेतले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 महेश कनवाडे यांना सर्कल श्री. खोत व कोतवाल श्री. हारगे, यांचेकडे मंडळ अधिकारी कार्यालय, कवठेमहांकाळ येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 महेश कनवाडे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.27 वा सुरु करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 कनवाडे असे माझेकडील हिरो मो.सा. क्र. एमएच-10-सीएस-3785 वरून रवाना होवून मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे दाखल होवून कार्यालयामध्ये गेलो.

त्यावेळी कार्यालयामध्ये सर्कल खोत व कोतवाल हारगे हे हजर होते. त्यावेळी मी सर्कल खोत यांची भेट घेवून आमचे प्रलंबित कामाबाबत विचारणा केली असता सर्कल खोत यांनी कोतवाल हारगे यांना माझे प्रकरणाबाबत विचारणा केली. त्यावेळी कोतवाल हारगे यांनी प्रकरण तयार असलेचे सांगून सहयासाठी माणसे घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी सर्कल यांनी देखील मला सहयासाठी प्रकरणातील माणसे घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.1 कनवाडे असे मंडळ अधिकारी कार्यालयामधून बाहेर येवून माझेकडील मो.सा. वरून रवाना होवून खाडे साहेब यांचे समक्ष हजर झालो.

त्यावेळी खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.39 वाजता काढून घेवून बंद केला. त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 कनवाडे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये सर्कल खोत व कोतवाल श्री. हारगे यांनी आमचे प्रलंबित कामातील अर्जदार यांना सहीसाठी घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला आमचे प्रलंबित गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरणातील सर्व अर्जदार यांना संपर्क करून त्यांना मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे हजर राहणेस सांगणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी अर्जदार 1)आण्णासाहेब ऊर्फ नाना गणपतराव जाधव (यांचे वडीलांना घेवून हजर राहणेबाबत) 2) शहाजी हंकारे, 3) रमिजा मुजावर, 4) अजित खोत (यांची आई शोभा खोत यांना हजर राहणेबाबत) व 5) प्रदीप हंकारे (यांचे वडील शहाजी हंकारे व शिवाजी हंकारे यांना हजर राहणेबाबत) यांना संपर्क करून त्यांना प्रलंबित गुंठेवारी



Scanned with OKEN Scanner

नियमीतीकरण प्रकरणामध्ये सहीसाठी मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे हजर राहणेस सांगितले. तसेच मी आण्णासाहेब ऊर्फ नाना जाधव यांना 5 ही प्रकरणातील अर्जदार हे मंडल अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे आलेनंतर मला संपर्क करणेस सांगितले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी आमचे प्रलंबित गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरणातील 5 ही अर्जदार हे मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे आलेनंतर मला व पंच नं.1 कनवाडे यांना सर्कल खोत व कोतवाल हारगे यांचेकडे पाठवून त्यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मला आण्णासाहेब ऊर्फ नाना जाधव यांनी 14.46 वा चे सुमारास त्यांचा मो.नं. 8668461966 वरून मला संपर्क करून 5 ही प्रकरणातील अर्जदार हे सही साठी मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे आले असलेचे सांगितले. त्यावेळी मी सदरबाबत खाडे साहेब यांना हकीकत सांगितली.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 महेश कनवाडे यांना सर्कल श्री. खोत व कोतवाल श्री. हारगे यांचेकडे पाठवून त्यांचेकडे पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंच नं.1 महेश कनवाडे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.55 वा सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून आम्हाला रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 कनवाडे असे माझेकडील हिरो मो.सा. क्र. एमएच -10-सीएस-3785 वरून रवाना होवून मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे दाखल झालो. त्यावेळी कार्यालयाचे बाहेर नाना जाधव, माझी आई तसेच आमचे प्रकरणातील सबंधीतं सर्व अर्जदार हे हजर होते. त्यावेळी आम्ही सर्व मंडळ अधिकारी कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी सर्कल खोत हे कोतवाल हारगे यांचे टेबलजवळ बसले होते. त्यावेळी मी सर्कल खोत यांचेजवळ जावून 5 ही प्रकरणातील अर्जदार यांना सहीसाठी घेवून आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी सर्कल खोत यांनी कोतवाल हारगे यांना "सहया घेवुन तयार करून घे" असे म्हणाले. त्यावर कोतवाल हारगे यांनी सर्कल खोत यांना "घेतो घेतो" असे म्हणालेने सर्कल खोत हे कार्यालयाचे बाहेर निघून गेले.

त्यानंतर कोतवाल हारगे यांनी आमचे गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरणातील 5 ही प्रकरणातील माझी आई व इतर सर्व अर्जदार यांच्या प्रकरणातील कागदपत्रांवर सहया घेवून सर्व अर्जदार यांचे फोटो प्रकरणास लावले.

त्यानंतर प्रकरणातील अर्जदार यांचे सहया झालेनंतर मी त्यांना घरी जाणेस सांगितले. त्याप्रमाणे प्रकरणातील सर्व अर्जदार हे मंडळ अधिकारी कार्यालयामधून निघून गेले. त्यानंतर मी, व कोतवाल हारगे यांचेबरोबर नाना जाधव व पंच नं.1 कनवाडे यांचेसमक्ष आमचे प्रकरणा संदर्भात चर्चा करू लागलो. त्यावेळी मी कोतवाल हारगे यांना पंच नं.1 कनवाडे यांची ओळख नाना जाधव यांचे दाजी असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी कोतवाल हारगे यांना "रावसाहेबांना एकदा विचारून एकदा रिक्वेस्ट करून काय होतय ते आम्हाला सांगा" असे विचारले असता कोतवाल हारगे यांनी मला "काय तुम्हीच सांगा की आता" असे म्हणाले. त्यानंतर मी कोतवाल हारगे यांना प्रकरणामध्ये परवा काय सांगितले आहे ते नाना जाधव यांना सांगणेस सांगितले असता कोतवाल हारगे यांनी पंचासमक्ष आण्णासाहेब उर्फ नाना जाधव यांना "आता सगळे मी हे करून काय केल" असे म्हणून त्यांचे मोबाईलवर 35,000/- असा आकडा टाईप करून दाखविला. त्यावेळी मी नाना जाधव यांना "हे मोबाईलवर दाखविल्यात बघ...पस्तीस....हजार ना?" असे कोतवाल यांना विचारले असता त्यांनी "हो" असे म्हणाले. त्यावर मी व नाना जाधव यांनी कोतवाल हारगे यांना रक्कम कमी करणेची विनंती करून सर्कल खोत यांना देखील आमचे वतीने रिकवेस्ट करणेची विनंती केली. त्यावर हारगे यांनी मला व नाना जाधव यांनाच रक्कम सांगणेबाबत आग्रह धरला असता आम्ही कोतवाल हारगे यांनाच रक्कम सांगणेची विनंती केली. त्यावर कोतवाल हारगे यांनी मला व नाना जाधव यांना "मी दोघांच्या समोर सांगतो एवढ करा आणि विषय संपवा" असे म्हणून त्यांचे मोबाईलवर 30,000/- असा आकडा टाईप करून आम्हास दाखविला. त्यावर मी त्यांना "तीस तीस हजार" असे म्हणालो असता कोतवाल हारगे यांनी होकारार्थी मान डोलावून "मी काय चुकीच बोलयोय काय....विषय संपवा जाऊदे मला लवकर" असे म्हणाले. त्यावर मी कोतवाल यांना पुन्हा रक्कम कमी करणेची विनंती करून सर्कल आण्णासाहेब यांचेशी चर्चा करून रक्कम कमी करणेची विनंती केली असता कोतवाल यांनी माझे मत विचारले असता मी त्यांना "वीस हजार" पर्यंत रक्कम करणेची विनंती केली. त्यावर हारगे यांनी "होत नाय अभि तेवढी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना तेवढे रक्कम करतो असे म्हणालो असता कोतवाल हारगे यांनी आम्हाला "बर एक काम करा प्रत्येकी पाच पाच हजार पंचवीस करा आणि विषय संपवा....जावा आता" असे म्हणून "घेवून या जावा... प्रत्येकी पाच प्रकरणाचे पंचवीस द्या...जावा आता...पटदिशी या.... पाठवून टाकू ढिगारा.....दोन दिवस घालवल्यात मी सुट्टीत" असे म्हणून माझ्याकडे प्रत्येक प्रकरणाचे 5,000/- रूपये एकुण 5 प्रकरणांचे 25,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितलेने मी व पंच नं.1 कनवाडे असे तेथून रवाना होवून खाडे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.33 वाजता



Scanned with OKEN Scanner

काढून घेवून बंद केला. त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 कनवाडे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाई मध्ये, आमचे व आमचे शेजारील इतर लोकांचे जुने खरेदी दस्ताचे प्रलंबित गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरणामध्ये सर्कल खोत यांनी, कोतवाल श्री. हारगे यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कोतवाल श्री. हारगे यांना भेटून प्रलंबित कामाबाबत चर्चा केली असता कोतवाल श्री. हारगे यांनी माझी आईचे व आमचे शेजारील इतर लोकांचे असे एकुण 5 गुंठेवारी नियमीतीकरण प्रस्तावांची चौकशी मंडळ अधिकारी मारुती खोत यांचेकडून पुर्ण करुन घेवुन तहसिलदार कवठेमहांकाळ यांना अहवाल पाठवण्यासाठी स्वत:करीता तसेच सर्कल खोत यांचेकरीता माझेकडे प्रथमत: 35,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती प्रत्येक प्रस्तावाचे 5,000/- रुपये प्रमाणे एकुण 5 प्रस्तावाचे 25,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच कोतवाल श्री.हारगे यांनी मला लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी लागलीच कोतवाल श्री. हारगे यांचेविरूध्द मंडळ अधिकारी कार्यालय, कवठेमहांकाळ येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला कोतवाल हारगे यांनी लाच मागणी केलेप्रमाणे 25,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील 500/- रूपये दराच्या एकुण 50 नोटा असे 25,000/- रूपये खाडे साहेब व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी खाडे साहेब यांनी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतल्या. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील श्रेणी पोउपनि पोपट पाटील यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 25,000/- रूपयांचा नोटांचा बंडल माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवला. व खाडे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर खाडे साहेब यांनी पथकातील श्रेणी पोउपनि पोपट पाटील यांना महांकाली विद्यानिकेतन कवठेमहांकाळ येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून त्यांचे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर खाडे साहेब यांनी 16.36 वाजता सापळा कारवाईचे त्यांचे, माझे व दोन्ही पंचांचे निवेदन घेतले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच खाडे साहेब यांनी मला कोतवाल हारगे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर खाडे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.42 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळयामध्ये अडकवून माझे शर्टच्या आतमध्ये सोडून आम्हाला रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 कनवाडे असे माझेकडील हिरो मो.सा. क्र. एमएच-10-सीएस-3785 वरून रवाना झालो. आमचे पाठोपाठ खाडे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने रवाना झाले. मी व पंच नं.1 कनवाडे असे मो.सा. वरून कवठेमहांकाळ गावामधून मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथील कार्यालयाचे पार्कींगमध्ये मो.सा. पार्क करून आम्ही मंडळ अधिकारी कार्यालयामध्ये आतमध्ये गेलो. त्यावेळी मी कोतवाल हारगे यांची भेट घेवून त्यांना "बसु का... आत जायच...." असे विचारले असता कोतवाल यांनी हाताने इशारा करून इथेच पैसे देणेचा इशारा केला. त्याप्रमाणे मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून कोतवाल हारगे यांचेसमोर धरून "तुम्ही म्हणला त्याप्रमाणे प्रत्येकी पाच पाच हजार, पंचवीस हजार हायत मोजून घ्या." असे म्हणून "आण्णासाहेबांना काय भेटायची भिटायची गरज न्हाय ना आता?" असे विचारले असता, कोतवाल यांनी लाच रक्कम पंचांसमक्ष त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे आतील चोर किश्यामध्ये ठेवून "हाय की रे अभिजीत" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "तुम्ही हाय म्हणून" असे म्हणालो असता कोतवाल हारगे यांनी मला "तुझ्यासाठी लगा सगळी एवढी करायची पाळी आल्या सगळी.....गरीब लोकाना सांगत न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "हा हा...चालतय मग जावू का.... आण्णासाहेब मग काय गेले काय घरी" असे विचारले. त्यावर कोतवाल हारगे यांनी त्यांचे टेबलवर ठेवली आमचे प्रकरण दाखवून "तुझच हाय बघ.....करून आलोय सगळ ठेवलय....आज जातील फक्त टपालात" असे म्हणाले. त्यावर मी कोतवाल हारगे यांना "हा चालतय..जाऊ काय मग" असे विचारले असता कोतवाल हारगे यांनी "हा" असे म्हणालेने मी कार्यालयामधून बाहेर आलो.

त्यावेळी कार्यालयाचे बाहेर सर्कल खोत हे समोर आल्याने मी त्यांची भेट घेतली. त्यावेळी सर्कल खोत यांनी मला "झाल का सगळ" असे विचारले असता मी सर्कल खोत यांना "व्हय आण्णासाहेब दिल बघा आता... हे पण



Scanned with OKEN Scanner

ठरल्याप्रमाणे त्यांचा प्रोटोकॉल पण केला सगळा" असे म्हणालो. त्यावर सर्कल खोत यांनी "सगळया सहया झाल्या का?" असे विचारले असता मी त्यांना "सगळयांच्या सहया पण झाल्या आणी हे पाच पाच हजार म्हणले होते प्रत्येकी, पंचवीस हजार म्हणले होते सगळ त्यांच्याजवळ दिलय...खोत आण्णासाहेब तेवढ आता..मार्गी लावा" असे म्हणालो. त्यावर सर्कल खोत यांनी "ठिक हाय, ठिक हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आता काय आडवू नका" असे म्हणालो असता सर्कल खोत यांनी "आडवायच काय तुम्हाला काय आडवलच न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना सगळा प्रोटोकॉल केला असल्याचे सांगितले असता सर्कल खोत यांनी "ओके" असे म्हणून कार्यालयामध्ये गेले. लागलीच मी बाजूस येवून माझे डावे हाताने पॅन्टचे डावे खिश्यातील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच सापळा पथकातील कर्मचारी पोना/चौगुले यांनी माझेजवळ येवून माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 16.51 काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला थांबण्यास सांगितले. त्यानंतर खाडे साहेब व सापळा पथकाने कोतवाल श्री. हारगे यांना ताबेत घेतले. तसेच त्यांचेकडील 25,000/-रूपये लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर खाडे साहेब यांनी सर्कल खोत यांना देखील ताबेत घेतले. तसेच खाडे साहेब यांनी कोतवाल हारगे यांचेकडून लाच रक्कम ताबेत घेतीवेळचे व्हिडीओ रेकॉर्डीग पथकातील अंमलदार यांचेकरवी केले आहे. त्यानंतर खाडे साहेब यांनी आमचे प्रलंबित प्रस्तावाची सर्व कागदपत्रे मंडळ अधिकारी कार्यालयातून ताबेत घेतली आहेत.

त्यानंतर खाडे साहेब यांनी सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या पुर्ण केल्या व सदर ठिकाणी पंचनामा करणेच गैरसोईचे असलेने पुढील सविस्तर सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह कवठेमहांकाळ येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 08.09.2025 रोजीचे 14.55 वा ते 15.33 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान कोतवाल श्री. संजय हारगे यांनी पंचासमक्ष मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने आम्ही खरेदी केलेल्या जमिनीची गुंठेवारी नियमीतीकरण प्रकरण मंडळ अधिकारी श्री खोत यांना सांगून प्रकरणातील चौकशी पुर्ण करून अहवाल देणेसाठी स्वत:साठी व सर्कल खोत यांचेकरीता माझेकडे 35,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती प्रत्येक अर्जाचे चौकशीकरीता 5,000/- रूपये प्रमाणे एकुण 5 प्रकरणांचे 25,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच दि. 08.09.2025 रोजीचे 16.42 ते 16.51 वा चे सापळा कारवाई दरम्यान कोतवाल श्री. संजय हारगे यांनी पंचासमक्ष मंडळ अधिकारी कार्यालय कवठेमहांकाळ येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझ्याकडून लाच रक्कम 25,000/- रूपये स्विकारली आहे. तसेच सर्कल श्री. खोत यांनी सापळा कारवाई वेळी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने कोतवाल श्री. हारगे यांचे लाच मागणी व स्विकृतीस संमती देवुन मला आमचे प्रलंबित काम करुन देण्याची हमी दिली आहे. म्हणून माझी आरोपी लोकसेवक 1) श्री. मारुती विलास खोत, वय -48 वर्षे, व्यवसाय - नोकरी (मंडळ अधिकारी- कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग- 3 आरोपी लोकसेवक 2) श्री. संजय किसन हारगे, वय-45 वर्षे, व्यवसाय - नोकरी (महसुल सेवक कवठेमहांकाळ) रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली, वर्ग-4, यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

jotiram ganpati patil(I (Inspector)) / DGPJGPM6802 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Abhijit

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

SHande
ठाणे अमलदार
कवठेमहांकाळ पोलिस ठाणे
जि सांगली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): jotiram ganpati patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPJGPM6802



Scanned with OKEN Scanner